## प्रकरण पाचवे

### श्री रत्नाप्पा कुंभार आणि त्यांचे शैक्षणिक कार्य ---

## प्रकरण पाचवे

## श्री रत्नाप्पा कुंभार आणि त्यांचे शैक्षणिक कार्य --

महाराष्ट्राची शैक्षणिक परंपरा थोर आहे. मानवी जीवनातील शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्व ओळखून या क्षेत्रात कार्य करणाऱ्या म.फुले, छ.शाहू महाराज यांच्यापासून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या परंपरा तेवढ्याच सामाजिक जाणिवेने आत्मिक तळमळीने पुढे चालविणाऱ्या ज्या मोजक्या व्यक्ती आणि संस्था आहेत. त्यामध्ये श्री रत्नाप्पा कुंभार आणि कौन्सिल ऑफ एज्युकेशन यांचा आवर्जून उल्लेख केला जातो. कौन्सिल ऑफ एज्युकेशन, कोल्हापूर ही महाराष्ट्रातील एक नामवंत शिक्षण संस्था आहे.

रत्नाप्पा कुंभार यांच्या ध्येयवादी व लोकहितवादी अशा उदार दृष्टीकोणामधून या संस्थेची स्थापना झाली. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात रत्नाप्पा कुंभारांनी सर्वसामान्य जनतेची व देशाची केलेली उदंड सेवा विदीतच आहे. जनकल्याणाच्या विविध योजना कल्पकतेने आखून त्या सर्वतोपरी यशस्वी करण्याचे त्यांचे कौशल्य वाखण्याजोगे आहे.

रत्नाप्पा कुंभार कोल्हापूर परिसरातील स्वातंत्र्य चळवळीतील एक राजकीय नेते म्हणून प्रसिध्द असून आपण शिक्षणक्षेत्राकडे कां वळलो हे सांगताना आण्णा म्हणतात " मी १९३३ मध्ये बी.ए. झाल्यानंतर मला वकिल व्हायचे होते म्हणून त्यावेळच्या कोल्हापूरातील लॉ कॉलेज मध्ये एलएल.बी. साठी प्रवेश घेतला होता या कॉलेजच्या पहिल्या बॅच मधील मी विद्यार्थी होतो पण त्याच वेळी स्वातंत्र्य प्राप्तीचा लढा जोमाने सुरु झालेला होता. म.गांधीच्या आदेशाने व आवाहनाने सर्व कर्तबगार तरुण चळवळीकडे ओढले गेले. मी

चळवळीत धडाडीने भाग घेतला. आंदोलने उभी केली, नेतृत्व केले , तुरुंगवास भोगला पण या धकाधकीत शिक्षण घेण्याची ओढ अंतर्यामी मनात तशीच राहिली. निदान शिक्षण क्षेत्रात नव्या पिढीला, समाजाला काही मदत करावी व त्यांच्या जीवन विकासाला काही हातभार लावावा या कर्तव्याच्या जाणिवेने या क्षेत्रात मी आलो.[१] या त्यांच्या उद्गारावरुन शिक्षणाबद्दलची ओढ व तळमळ दिसून येते.

कौन्सिल ऑफ एज्युकेशन या संस्थेने चालवलेल्या शहाजी लॉ कॉलेज चा व रत्नाप्पा कुंभार यांचा अत्यंत निकटचा आणि जिव्हाळ्याचा संबंध अगदी प्रारंभापासूनच आहे. सातारा-सांगलीपासून ते खाली दक्षिणेत म्हैसूर पर्यन्तच्या भागात कायदेविषयक शिक्षण देणारे एकही महाविद्यालय त्यावेळी अस्तित्वात नसल्याने कोल्हापूर संस्थानचे छ.राजाराम महाराज यांच्या प्रेरणेने तारीख १७ जून १९३३ रोजी साईक्स लॉ कॉलेजची स्थापना झाली.[२]

ह्याच लॉ कॉलेज मध्ये छ.शहाजी महाराज यांनी विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला. त्याचवेळी राजाराम महाविद्यालयातून बी.ए. ची पदवी घेऊन रत्नाप्पा कुंभार हेही लॉ कॉलेजमध्ये विद्यार्थी म्हणून दाखल झाले अशा प्रकारे लॉ कॉलेजचा शुभारंभ नमुनेदार पध्दतीने झाला. ' दि कौन्सिल ऑफ लिगल एज्युकेशन ही संस्था सन १९३९ मध्ये बंद करण्यात आली. त्यावेळी पासून ते कोल्हापूर संस्थान मुंबई राज्यात विलिन होईपर्यन्त साईक्स लॉ कॉलेज हे कोल्हापूर दरबारमार्फत चालविले गेले. पुढे दोन वर्षे हे कॉलेज मुंबई सरकारने चालविले. पण १९४८ ते १९५१ या वर्षात विद्यार्थी संख्या भयंकर घटली. आर्थिकदृष्ट्या ते सतत तोट्यात येऊ लागले. म्हणून त्यावेळच्या शासनाने हे कॉलेज बंद करण्याचा निर्णय घेतला. मुंबई-पुण्या नंतर महाराष्ट्रात कायद्याचे शिक्षण देणारे हेच महत्वाचे कॉलेज होते हे कॉलेज बंद पडल्याने ग्रामीण जनतेचे फारच नुकसान होणार होते. शिवाय व्यक्तिगत दृष्टिकोनातून रत्नाप्पा कुंभार यांना हे अयोग्य वाटले. तसेच कोल्हापूरातील काही सुज्ञ शिक्षणप्रेमी मंडळींनी एकत्र येऊन हे कॉलेज स्वतंत्रपणे चालविण्याचा निर्णय घेतला व पूर्वीची दि कौन्सिल ऑफ लिगल एज्युकेशन या संस्थेच्या घटनेत बदल करुन ' कौन्सिल

ऑफ एज्युकेशन ' या खाजगी संस्थेची स्थापना केली व लॉ कॉलेज १९५२ साली या संस्थेमार्फत चालविण्यासाठी घेतले. त्यावेळी कोल्हापूरचे छ. शहाजी महाराज या संस्थेचे प्रमुख आश्रयदाते झाल्याने त्यांचे नाव या कॉलेजला दिले गेले. अशा रीतीने साईक्स लॉ कॉलेजचे रुपांतर शहाजी लॉ कॉलेज मध्ये झाले. या संस्थेच्या अध्यक्षपदी रत्नाप्पा कुंभार यांची निवड झाली. सन १९६० मध्ये त्या वेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.श्री.यशवंतराव चव्हाण यांनी रत्नाप्पा कुंभार यांच्या शैक्षणिक कार्याने प्रभावित होऊन ' कौन्सिल ऑफ एज्युकेशन ' या संस्थेला तोफखान्याची इमारत कायमची दिली. हा एक प्रकारे महाराष्ट्र शासनाने संस्थेच्या कार्याचा केलेला गौरव होय.[3]

' कौन्सिल ऑफ एज्युकेशन ' आणि रत्नाप्पा कुंभार म्हणजे ' कौन्सिल ऑफ एज्युकेशन ' असे समीकरणच तयार झाले आहे. दे.भ. रत्नाप्पा कुंभार हेच या संस्थेचे बळ आहे, खरी शक्ती आहे, सामर्थ्य आहे. एखादी व्यक्ती एखाद्या संस्थेच्या कार्यामध्ये किती समरस होते, निस्पृहपणे किती कार्य करु शकते याचा हा एक आगळा वेगळा नमुना आहे. रत्नाप्पा कुंभार यांचे सहकारी निवडलेली गुणवान शिक्षक मंडळी ही त्यांच्या उज्ज्वल कार्याची साक्ष आहे. या सर्वांच्या उत्तम सहकार्याने आण्णांनी साधलेले हे शैक्षणिक कार्य निश्चितच भूषणावह आहे.

गेल्या चाळीस वर्षांत ' कौन्सिल ऑफ एज्युकेशन ' या संस्थेने ज्या तीन महाविद्यालयाच्या रुपाने मा.आण्णांच्या जीवनात जे शैक्षणिक कार्य केले आहे त्या महाविद्यालयाची माहिती खालील प्रमाणे आहे ---

१) <u>शहाजी लॉ कॉलेज</u> ---

शहाजी लॉ कॉलेज चे पूर्वीचे नाव साईक्स लॉ कॉलेज असे होते. हे कॉलेज पूर्वी शाहूपूरीतील साईक्स इमारतीमध्ये होते. कोल्हापूर संस्थानचे छ.राजाराम महाराज यांच्या आश्रया खालील ' कौन्सिल ऑफ लिगल एज्युकेशन ' या संस्थेने श्री राजाराम महाराज यांच्या प्रेरणेने १७ नोव्हेंबर १९३३ रोजी कॉलेजची स्थापना केली. २ नोव्हेंबर १९३३ रोजी मुंबई चे गव्हर्नर फ्रेडरिक

साईक्स यांचे हस्ते कॉलेज चे उद्घाटन झाले. त्यावेळी या कॉलेजचे नाव " साईक्स लॉ कॉलेज " असे ठेवले . पुढे हे कॉलेज १९५१ मध्ये " दि कौन्सिल ऑफ एज्युकेशन " या संस्थेकडे दिले त्यावेळीचे छ.शहाजी महाराज हे या संस्थेचे प्रमुख आश्रयदाते होते म्हणून या कॉलेजला " शहाजी लॉ कॉलेज " हे नांव दिले गेले. अशा रीतीने साईक्स लॉ कॉलेज चे रुपांतर शहाजी लॉ कॉलेज मध्ये झाले. नंतर १९५५ मध्ये या कॉलेज चे स्थलांतर रविवार पेठेतील तोफखाना इमारतीमध्ये झाले. मा.रत्नाप्पा कुंभार यांनी खुप परिश्रम घेऊन ही सर्व जागा त्यावेळचे मुंबई चे मुख्यमंत्री कै.श्री.यशवंतराव चव्हाण यांचेकडून " कौन्सिल ऑफ एज्युकेशन " ला देणगी म्हणून मिळवून दिली. आता शहाजी लॉ कॉलेजचे आणखी एक स्थलांतर कॉलेजसाठी बांधलेल्या नव्या इमारतीत झाले आहे. ही नवी इमारत कॉलेजच्या मालकीच्या क्रिडांगणामध्ये शाहुपूरीतील साईक्स एक्सटेंशनमध्ये जुन्या साईक्स इमारती जवळ आहे. त्या इमारतीच्या पाठीमागे पॅव्हेलियन व क्रिडांगण असून इतक्या जवळ क्रिडांगण असलेले शहाजी लॉ कॉलेज हे कोल्हापूर शहरातील एकमेव कॉलेज आहे. कोणत्याही प्रकारच्या सरकारी अनुदानाची मदत न घेता या संस्थेने स्वबळावर आर्थिक अडचणींना तोंड देवून कॉलेजच्या स्वत:च्या क्रिडांगणावर स्वत:च्या मालकीची १६ लाखाची दुमजली प्रशस्त वास्तू बांधली आहे.

एकेकाळी ६० या विद्यार्थी संख्ये वरुन आज ८३० पर्यन्त विद्यार्थी संख्या गेली आहे. या महाविद्यालयात जुना तीन वर्षांचा कायद्याचा अभ्यासक्रम व पदव्युत्तर एलएल.एम. या अभ्यासक्रमासह शिकवला जातो. १९८३-८४ पासून १२ वी नंतरचा कायद्याचा पाचवर्षाचा नवीन अभ्यासक्रमही सुरु करण्यात आला आहे. १९८४ मध्ये शहाजी लॉ कॉलेजची महाराष्ट्र राज्य सरकारने मोफत कायदा सल्ला केन्द्राद्वारे काम करण्यासाठी निवड केली आहे. या केन्द्राद्वारे जिल्ह्याच्या निरनिराळ्या भागामध्ये शिबिरे भरवून कायद्याचा मोफत सल्ला देण्याचे काम सुरु केले आहे. देशाच्या विविध महाविद्यालयापैकी या कॉलेजचे ग्रंथालय आधुनिक व सुसज्ज आहे. या ग्रंथालयात १४००० ग्रन्थ व ऑल इंडिया रिपोर्टस ,सुप्रिम कोर्ट जर्नल्स आहेत. ग्रंथालयास अनेक विद्वान व्यक्तींनी भेटी दिलेल्या आहेत. हे कॉलेज स्वत:च्या भव्य वास्तुमध्ये आता चालू आहे.

२) कॉलेज ऑफ कॉमर्स --

शहाजी लॉ कॉलेज ने कोल्हापूर व कोल्हापूरच्या परिसरातील कायदे शिक्षणाची गरज भागवली. परंतू कोल्हापूरच्या शैक्षणिक सोईमध्ये व्यापार विषयक शिक्षण देणाऱ्या संस्थेची मोठी उणीव होती. वास्तविक कोल्हापूर हे लहान कारखानदारांचे व शेतीमालाच्या व्यापाराचे महाराष्ट्रातील एक प्रमुख केन्द्र असल्यामुळे अशा संस्थेची निकडीची गरज भासत होती. कौन्सिल ऑफ एज्युकेशन ने ही काळाची गरज ओळखून १९५७ साली तोफखाना इमारतीतच कॉलेज ऑफ कॉमर्स सुरु केले. या कॉलेजचे पहिले प्राचार्य म्हणून कै.डॉ.भा.शं. भणगे यांची नेमणूक केली. संस्थेने कॉमर्स कॉलेज साठी १८ लाखाची पाच मजली इमारत बांधली आहे. तसेच १२५ विद्यार्थ्यांची सोय होईल असे वसतिगृह बांधले आहे.

महाविद्यालयाच्या सुरुवातीस फक्त १३९ विद्यार्थी होते आज या महाविद्यालयात २,४६७ विद्यार्थी शिक्षण घेतात. सध्या महाविद्यालयात ज्युनियर,(वाणिज्य ), सिनियर ( वाणिज्य ) विभाग असून एम.कॉम . व एम.बी.ए. या सारखे पदवीत्तोर अभ्यासक्रम शिकविले जात आहेत.

कॉमर्स कॉलेज चे वैशिष्ठ्ये म्हणजे महाविद्यालयाचे प्रशस्त व सुसज्ज ग्रंथालय, विविध विषयाचे १४,००० ग्रन्थ व १५० नियतकालिके ग्रंथालयामध्ये आहेत. तसेच गरीब व हुषार विद्यार्थ्यांसाठी आर्थिक साह्य व पुस्तक पेढी उपलब्ध करुन दिली आहे. आज या कॉलेजला ३४ वर्षे पूर्ण झाली आहेत.

3) नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स --

स्वातंत्र्योत्तर काळात शैक्षणिक सोईंचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला. अनेक सवलतीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहिलेल्याना उच्च विद्या - भुषित होण्याची संधी मिळू लागली. पण परिस्थितिमुळे ,आर्थिक अडचणीमुळे, नोकरी व्यवसायामुळे ज्याना उच्च शिक्षण घेता आले नाही अशा विद्यार्थ्यांची

गरज ओळखून 'कौन्सिल ऑफ एज्युकेशन' ने १९७१ साली नाईट कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्स ' हे शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेतील रात्रीचे महाविद्यालय सुरु केले. रात्रीचे महाविद्यालय असल्यामुळे विद्यार्थी संख्या कमी होती. त्यामुळे आर्थिक नुकसान सोसूनही संस्थेने जिद्दीने हे महाविद्यालय चालू ठेवले आहे. या महाविद्यालयास आज २० वर्षे पूर्ण होत आहेत. या महाविद्यालयातून आज कला व वाणिज्य शाखेचे शिक्षण दिले जाते. सध्या कॉलेजची विद्यार्थी संख्या ६६६ इतकी आहे. विद्यार्थ्यांच्यासाठी विद्यार्थी मदत निधी, पुस्तकपेढी, अभ्यासिका, मार्गदर्शन केन्द्र अशा सोई आहेत."

कौन्सिल ऑफ एज्युकेशन या संस्थेची शिक्षण क्षेत्रातील भरीव कामगिरी उल्लेखनीय आहे. शहाजी लॉ कॉलेज चे स्थलांतर नवीन जागेत झाल्यानंतर मोकळ्या होणाऱ्या जागेचा उपयोग विविधोपयोगी सभागृह बांधण्यासाठी करण्याचा संकल्प सोडण्यात आला आहे. शिक्षण हे समाज व राष्ट्र परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे हे कौन्सिल ऑफ एज्युकेशन ने समाजाला सिध्द करून दाखवले आहे.

४) <u>रत्नदिप हायस्कूल - गंगानगर इचलकरंजी व इतर शैक्षणिक संस्था</u> --

कौन्सिल ऑफ एज्युकेशन मार्फत चालवलेली तीन महाविद्यालये कोल्हापूरात शिक्षणाचे काम अव्याहतपणे करीत आहेत. या संस्थेचे आण्णा गेली अनेक वर्षे अध्यक्ष आहेत. त्याच बरोबर पंचगंगा साखर कारखान्याच्या परिसरात आण्णानी एक संस्था काढून त्या मार्फत ' रत्नदिप हायस्कूल ' गंगानगर इचलकरंजी या ठिकाणी सुरु केले आहे. तसेच दुसरे हायस्कूल कै. दादासाहेब रामचंद्र मगदूम ' का सांगाव हायस्कूल सुरु केलेले आहे. ही दोन्ही हायस्कूल्स अनेक गोरगरीब विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षण देण्याचे कार्य करीत आहेत. आण्णा या संस्थेचे पदाधिकारी आहेत. सर्वतोपरी अर्थसहाय्य देत आहेत.

या शिवाय डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन पुणे ( माजी अध्यक्ष ), श्री गुरुदेव गोरोबा स्मारक समिती, उमरखेड, अध्यक्ष, उमरखेड येथील

हायस्कूल , प्राथमिक शाळा, बालवाडी, मागासवर्गीय मुलामुलींचे हायस्कूल, श्री संत तुकडोजी महाराज हायस्कूल, दौंड ,अध्यक्ष,श्री संत शिवगंगादेवी ट्रस्ट हायस्कूल, पुणे, अध्यक्ष,अखिल भारतीय कुंभार समाजोन्नती संस्था पुणे,अध्यक्ष, इ. शैक्षणिक संस्थाचे आण्णा पदाधिकारी असून त्यांना मार्गदर्शन तर करतातच पण भरीव अर्थ सहाय्य सदैव देत आलेले आहेत त्यामुळे शिक्षण प्रसाराचे कार्य चालूच आहे.[५]

श्री रत्नाप्पा कुंभार यांचे शिक्षण विषयक विचार --

प्रा.रा.तु.भगत यांच्या 'महात्मा जोतिराव ते कर्मवीर भाऊराव' या शैक्षणिक ग्रन्थाचे प्रकाशन करताना दे.भ.रत्नाप्पा कुंभार यांनी नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स कोल्हापूर येथील विद्यार्थ्यांच्या समोर उद्बोधक भाषण केले.

शिक्षण एक अखंड जीवन प्रक्रिया --

' शिक्षण हे केवळ शाळा कॉलेजातून अथवा पुस्तकातून मिळते असे आपण मानतो ते फारसे बरोबर नाही. जीवनातील नव्या अनुभवाचा अर्थ समजावून घेणे अथवा समजावून देणे या विशिष्ट प्रक्रियेलाच आण्णा शिक्षण असे म्हणतात. शिक्षण हे जीवनाशी निगडीत आहे. अगदी पाळण्यापासून ते स्मशानापर्यन्त मनुष्य शिकतच असतो. ' म्हणून आण्णा शिक्षणास अखंड जीवन प्रक्रिया मानतात.[६]

शिक्षण - आदर्श नागरिक निर्माण करण्याचे साधन --

' लोक जीवनात आमुलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचे साधन म्हणजे शिक्षण होय. शिक्षणातून आदर्श समाजाची बांधणी होऊ शकते. निकोप, स्वावलंबी, स्वातंत्र्यप्रेम व श्रमप्रतिष्ठेवर विश्वास ठेवणारा समाज निर्माण करण्याचे साधनही शिक्षणच आहे. लोकशाही पध्दतीने जगणाऱ्या भारतात शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. शिक्षण हेच लोकशाही राज्य पध्दतीचे प्राणवायु तत्व होय आणि म्हणून भारतासारख्या लोकशाही प्रधान

देशातील शिक्षणाचे ध्येय एका विशिष्ठ ठिकाणी पोहोचण्याचे नसून गतिमान जीवनाकडे अंगुलिनिर्देश करण्याचे आहे असे आण्णा मानतात. आजचा विद्यार्थी उदयाचा आदर्श नागरिक बनावयाचा झाल्यास त्याला गतिमान जीवनाकडे पहाण्याची दृष्टी प्राप्त झाली पाहिजे व गतिमान जीवनाचा अर्थ समजण्याची पात्रताही त्याच्यामध्ये निर्माण झाली पाहिजे." ७

<u>विद्यार्थ्यांचे कर्तव्य --</u>

श्री आण्णांच्या मते "लोकशाही राज्य व्यवस्थेत समाज बांधणीचे काम समर्थपणे करावयाचे असेल तर माणूस सुशिक्षित व सुसंस्कृत बनला पाहिजे. सर्व समाज सुशिक्षित करण्याचे ध्येय विद्यार्थ्यांने आपल्या मनाशी बाळगले पाहिजे. प्रत्येक माणसाला वाचता आले पाहिजे. वाचलेले कृतित आणता आले पाहिजे. प्रत्येक खेडे गावातील अज्ञानाचे माळ फोडून तेथे ज्ञानाचे नंदनवन करण्याचे काम विद्यार्थ्यांनी स्विकारले पाहिजे. राष्ट्रीय बलवत्तर धाग्याने सर्वांची मने बांधली पाहिजेत. तरच आपण स्वातंत्र्य प्राप्तिच्या वेळी देशाच्या विकासाचे जे मनोरथ बाळगले होते ते सिध्दिस जातील अशा राष्ट्रीय वृत्तीच्या सिध्दीस देश संपन्न करण्याचा संकल्प केला पाहिजे." ८

<u>क्रीडांगण - राष्ट्रीय ऐक्याचे संवर्धन केन्द्र --</u>

मिरज येथील भानुतालीम संस्थेच्या सुवर्ण महोत्सव प्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात दे.भ.रत्नाप्पा कुंभार यांनी तरुण पिढीला उद्देशून काढलेले उद्गार पुढीलप्रमाणे ---

"आजच्या मरगळलेल्या तरुणाला विधायक कार्याच्या दिशा दाखविणे आवश्यक आहे. स्वतंत्र भारताचे ख-या अर्थाने भूषण ठरतील असे तरुण निर्माण करणे जरूर आहे.

क्रिडा ही मनुष्याची एक सहज प्रवृत्ती आहे. मनुष्याच्या सर्व सहज प्रवृत्तींचा विकास करणे हा शिक्षणाचा मुख्य हेतू आहे म्हणून विद्यार्थी घडविण्याचे कार्य क्रीडांगणावर ख-या अर्थाने होईल असे आपणाचे मत आहे. परस्पर द्वेष, वैर आणि अनीती यांची जळमटे नष्ट करण्याचे एक आदर्श ठिकाण म्हणून आपणा क्रिडांगणाकडे पहात आले आहेत. निरोगी शरीराची बांधणी क्रीडांगणावर होते. निरोगी मनाची बांधणी शाळेत होते. निरोगी शरीरात निरोगी मन वास करीत असते. परंतु केवळ शरीरसौष्ठवासाठी खेळांची गरज आहे असे नाही. ज्या क्रीडांगणावर खेळत असताना जय-पराजयाकडे पाहाण्याची आपली दृष्टी खिलाडूवृत्तीची असते, तेथेच मनुष्य ख-या अर्थाने घडला जात असतो असा मनुष्यच लोकशाही साठी उपयुक्त ठरतो. लोकशाहीसाठी सुदृढ व सुजाण नागरिक तयार करणे हेच क्रीडांगणाचे खरे कार्य आहे. राष्ट्रीय ऐक्याचे संवर्धन करण्यासाठी क्रिडांगणासारखे दुसरे प्रभावी साधन नाही. क्रिडांगणावर मिळणारे न्याय, नीति, शील, प्रामाणिकपणा व सुसंस्कृतपणा याचे शिक्षण मानवी जीवनाची खरी खुरी जडण घडण असते." [९]

कोल्हापूर येथील " नाईट कॉलेज ऑफ्‌ आर्टस " मध्ये आयोजित केलेल्या भारतीय स्वातंत्र्य रौप्य महोत्सव समारंभाचे वेळी विद्यार्थ्यांना उद्देशून श्री रत्नाप्पा कुंभार यांनी काही विचार मांडले ते पुढील प्रमाणे ---

देशाचे आधार स्तंभ --

" स्वार्थीपणा, स्वाभिमानशून्यता व संधीसाधूपणा हे भारतीय पुरुषाला जडलेले विकार आहेत. या विकारामुळे देशाचा विकास साधणे अवघड होत चालले आहे. तरुण लोक म्हणजे देशाची प्रचंड शक्ती आहे. या शक्तीला वरील विकासा पासून दूर ठेवण्याची नितांत गरज आहे, ही गरज भागवण्यासाठी तरुणांना निकोप शिक्षण द्यावे लागेल. कारण आपल्या देशाचे खरे आधार-स्तंभ हे आजचे तरुणच आहेत. रक्त सांडून मिळविलेला देश होतकरू, निरिच्छ व सेवाभावी तरुणांच्या हाती पडला पाहिजे." [१०]

स्वराज्याचे सोने करा --

आण्णांच्या मते " स्वराज्य प्राप्तीसाठी जेवढे प्रयत्न केले गेले त्याहून अधिक प्रयत्न या स्वराज्याचे रामराज्य करण्यासाठी करावे लागतील. स्वराज्याचे सोने करण्याची जबाबदारी तरुणांची आहे. स्वातंत्र्य प्राप्तीने दोन महत्वाच्या घटना या खंडप्राय देशात घडल्या. पहिली घटना भारत देश एक झाला, दुसरी घटना समान कायद्याचे राज्य प्रस्थापित झाले. यापूर्वी भारत एक होता पण तो केवळ भौगोलिकदृष्ट्या अनेक राजांची राज्ये येथे नांदत होती. एकत्वाची लाभलेली संधी ख-या अर्थाने गेली कित्येक वर्षात आपण घेतली नाही क्षुद्र प्रादेशिक वाद आपल्या देशात उभे राहिले आणि क्रमाक्रमाने आपले एकत्व भंग पावत निघाले. परंतु परचक्रासारखे एखादे संकट उभे राहिले की मग आसेतुहिमाचल आपण एक असतो आणि ही अशी एकता कायम टिकवल्याशिवाय स्वराज्याचे सोने होईल असे वाटत नाही. स्वतंत्र भारतात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी आपला स्वाभिमान जागृत ठेवून निर्भय झाले तर स्वातंत्र्य मिळवण्यामागील सर्व हेतू साध्य होतील." [11]

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद शाखा इचलकरंजीच्या वतीने सर्व प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभाच्या वेळी दे.भ.रत्नाप्पा कुंभारांनी खालील उद्‌गार काढले --

आजचा विद्यार्थी आक्षेप व निराकरण --

" दुय्यम शिक्षणापासून उच्चशिक्षणापर्यन्त ज्या अनेक समस्या आहेत. त्यामध्ये आजचा विद्यार्थी ही एक समस्या आहे अशी अनेकांची धारणा आहे. कारण आजच्या विद्यार्थ्यावर अनेक दोषारोप केले जातात. उदा. आजचा विद्यार्थी नियमितपणे शाळा कॉलेजात जात नाही, अभ्यासही करत नाही, शिस्त पाळत नाही व कधीकधी परीक्षेला बसत नाही असे काही आक्षेप विद्यार्थ्यांवर केले जातात. राष्ट्रीय वृत्तीची जोपासना करणारा शिक्षणक्रम पाहिजे, आपल्या विषयात तज्ञ व रस घेऊन शिकवणारा शिक्षक पाहिजे व याचा फायदा घेऊन आपल्या जीवनाचा गुणवत्ता वाढविणारा विद्यार्थी पाहिजे. एखाद्या

सोप्या शब्दात विद्यार्थ्यांच्यावरील आक्षेपाचे निराकरण करणे सोपे नाही. शारीरिक विकासासाठी जशी सकस अन्नाची गरज आहे तशी मानसिक विकासासाठी सकस शिक्षणाची गरज आहे. विद्यार्थी ही एक प्रचंड शक्ती असल्याने या शक्तीचा तोल सांभाळणारे शिक्षण आज जर दिले गेले नाही तर या शक्तीचा केव्हा व कसा स्फोट होईल हे सांगता येणार नाही." [12]

नागपूर येथे विदर्भ खाजगी प्राथमिक शिक्षक संघाच्या परिषदेच्या समारोपाच्या वेळी दे.भ. रत्नाप्पा कुंभार यांनी शिक्षकांना उद्देशून केलेले भाषण --

शिक्षक - समाज परिवर्तनाची एक शक्ती ---

" माणसे घडविणारी शिक्षकाची पिढी ही समाज परिवर्तनाची एक जबरदस्त शक्ती आहे. शिक्षणातून एक सिध्द व समर्थ माणूस निर्माण करण्याची प्रचंड जबाबदारी शिक्षकावर येऊन पडलेली आहे. विद्यार्थ्यांपुढे नैतिक, वैचारिक व सांस्कृतिक वारसा धरून उभारणारे व्यक्तीमत्व नाही. शिक्षकाने आपला दर्जा ओळखून तो कसा जपावा याचाच विचार करण्याची वेळ आली आहे." [13]

आजचे शिक्षण हीच आजची समस्या --

" शिक्षणापासून एक समर्थ मनुष्य घडवायचा असतो, शिक्षण हे जीवनाच्या समस्त समस्या सोडविण्याचे एक प्रधान साधन असते पण आज आपल्या लोकशाही राज्यात शिक्षण हीच समस्या सोडविण्यासाठी शिक्षणाचे सरकारीकरण करावे हा तोडगा अनेकजण सुचवतात पण शिक्षण खाजगी क्षेत्रात राहिले काय किंवा त्याचे सरकारीकरण झाले काय दोन्ही स्थितीत शिक्षण सूत्रे माणसाकडेच राहाणार आहेत. स्वयंप्रेरणेने व कर्तबगारीने लोकशाही जशी सबल व समर्थ होते तशी शिक्षण प्रक्रियाही स्वयं प्रेरणेने व कर्तबगारीने काम करणाऱ्या शिक्षकांच्या बळावर अवलंबून असते.लोकशाही जीवन निष्ठांची उपासना करणाऱ्या शिक्षणाची गरज आहे." [14]

आधी कळस मग पाया --

" स्वातंत्र्योत्तर काळामध्ये माणसाची मनोरचना करण्याचे काम बालवाडी सारख्या शैक्षणिक कार्यातून करता येईल अशी आपणाची ठाम समजूत आहे. लोकशाही राज्यासाठी कशाप्रकारचा माणूस पाहिजे ते ठरवून बालवाडीतच बालमनावर योग्य ते संस्कार करता येतील म्हणूनच प्रत्येक वस्तीत बालवाडी हवीच हे आता झोपडपट्ट्यातील रहिवाशी देखिल कबुल करू लागले आहेत. आपल्या देशात शैक्षणिक विस्ताराचा सुन्दर कळस निर्माण केला असेल पण त्या शिक्षण मंदिराचा पाया मात्र भक्कम केला गेला नाही अशी आजची अवस्था आहे." [१५]

श्रम हीच पूजा --

" व्यक्तिकदृष्ट्या शील संपन्न, चारित्र्यवान, सुसंस्कृत व समाजाला उपयोगी असा नागरिक निर्माण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. आपल्या मुलाला दिल्या जाणाऱ्या शिक्षणामुळे तो समाजाला कितपत उपयोगी पडेल हे पहाण्याची जबाबदारी पालकांची आहे. आजच्या सुशिक्षित बेकार तरुणांची संख्या कमी करावयाची असेल तर शिक्षण व जीवन यांचा मेळ घातला पाहिजे. जीवनासाठी शिक्षण आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. शिक्षणात तेव्हा श्रमाच्या प्रतिष्ठेची जपणूक केली जाईल तेव्हा राष्ट्रीय ऐक्याची भावनाही वाढेल. आजच्या शिक्षणात श्रमाची आराधना कशी करता येईल हे पाहून ' श्रम हीच पूजा ' हा मनोभाव वाढीस लावला पाहिजे. या दृष्टीकोनातून शैक्षणिक कार्याची फेर आखणी झाली पाहिजे." [१६]

ग्रामीण शैक्षणिक विकास योजना --

रत्नाप्पा कुंभार यांनी पंचगंगा कारखान्याच्या परिसरात ग्रामीण भागातील अज्ञानाचा अंधःकार नाहीसा करण्यासाठी पूर्वीपासून अनेक दर्जाच्या भरीव योजना हाती घेतल्या आहेत. या योजनेत महाविद्यालये, माध्यमिक विद्यालये, प्राथमिक शाळा, बालवाड्या यांच्या इमारत बांधकामासाठी खेळांच्या मैदानासाठी,

वाचनालयाची पुस्तके खरेदी करण्यासाठी बुक बँक योजना, सायन्स, तांत्रिक साहित्य खरेदीसाठी, एस.एस.सी. गुणवत्ता निकाल पारितोषिकासाठी, तांत्रिक साहित्य व संशोधन कार्य, वैद्यकीय व कृषि विद्यार्थ्यांना बिनव्याजी कर्ज देण्याचे, प्राथमिक व माध्यमिक हुशार व गरीब विद्यार्थ्यासाठी पुणे येथील ज्ञानप्रबोधिनीमध्ये शिक्षण यासाठी कारखान्यामार्फत प्रत्येक वर्षी भरीव आर्थिक साह्य दिले जाते. या भागातील शेतकऱ्यांना फक्त श्रीमंत होऊन चालणार नाही तर आचार विचाराने या खेड्यातील मुले मुलीही सुसंस्कृत व संपन्न बनली पाहिजेत अशी या पाठीमागची आण्णांची धारणा आहे अशा ग्रामीण भागातील गरजांचे क्रम ठरवून त्या भागविण्यासाठी योजनाबद्ध शैक्षणिक कार्यक्रमाची कारवाई करणे हेच रत्नाप्पा कुंभार यांच्या कार्यपद्धतीचे एक फार मोठे ठळक वैशिष्ट्ये आहे.

महाविद्यालय व माध्यमिक विद्यालय इमारत बांधकामासाठी प्रत्येक घालून दिलेल्या धोरणानुसार कारखान्यामार्फत १५,००० रुपये अनुदान देण्यात येते. यासाठी आतापर्यंत कॉलेज इमारत बांधकामासाठी रु.१,३३,५००- देण्यात आले. तर माध्यमिक शाळा इमारत बांधकामासाठी रु.५,११,००६- इतकी मदत करण्यात आली. बालवाडी साहित्य खरेदीसाठी नगरपालिका हद्दीत रु.५००- व इतर गावात रु.२५०- आणि दरवर्षी प्रत्येक बालवाडीत २५०- ते ५००- रु.अनुदान वार्षिक अनुदान देण्यात येत असून त्यासाठी आतापर्यंत ९०,४३९-० रुपये अर्थ सहाय्य देण्यात आले.७० टक्के निकाल लागलेल्या माध्यमिक विद्यालयांना व एस.एस.सी.परीक्षेत गुणवत्ता मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना कारखान्यामार्फत प्रत्येक वर्षी बक्षिस पारितोषिक देण्यात येतात.आतापर्यंत यासाठी रु.३५,०००- खर्च करण्यात आले आहेत. सायन्स व तांत्रिक साहित्य खरेदीसाठी दरवर्षी कारखान्यामार्फत रु.१,५००- देण्यात येत असून आतापर्यंत यावर रु.६,०४,२८०- खर्च करण्यात आले आहेत. प्राथमिक शाळेतील गरीब

विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय व त्यांच्या आर्थिक मदतीसाठी कारखाना प्रत्येक विद्यार्थ्या मागे रु.१२५- खर्च करतो. आता पर्यंत अशा पुण्याच्या ज्ञानप्रबोधिनीतील विद्यार्थ्यासाठी कारखान्यामार्फत रु.५०, २१- खर्च करण्यात आले. खेळ व खेळाच्या मैदानासाठी अगर शाळांच्या कंपाऊंडसाठी कारखान्यामार्फत रु.२,५००- मदत करण्यात येते. यासाठी आतापर्यन्त रु.४५,०००- खर्च करण्यात आले. तांत्रिक शिक्षण व संशोधन यामध्ये वैद्यकीय व कृषितज्ञ विद्यार्थ्यांना प्रत्येकी वार्षिक रु.१०००- या प्रमाणे रु.५०००-०० खर्च करण्यात येते. या योजनेतून आतापर्यन्त १०२ डॉक्टर्स तयार झाले, व या योजनेद्वारे आतापर्यन्त रु.२,५०,०००- खर्च करण्यात आले. दुष्काळ ग्रस्त,टंचाई ग्रस्त विद्यार्थ्यांना भोजन व अर्थ साहाय्यासाठी कारखान्याने आतापर्यन्त रु.१,४३,०००- खर्च केले असे एकूण शैक्षणिक विकास योजनेवर या कारखान्याने आतापर्यन्त १५ लाख रुपये खर्च केले असून याचा फायदा कार्यक्षेत्रातील आजपर्यन्त ४ महाविद्यालये, ५१ माध्यमिक विद्यालये व अनेक प्राथमिक शाळा यांनी घेतला असून ही संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. तसेच कीर्तन महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी कारखान्याकडून शिष्यवृत्ती देण्यात येते.[१७]

अशा रीतीने शिक्षण हे मानवी जीवनात आमूलाग्र बदल करते व शिक्षण प्रसार हेच सर्व अज्ञानावर उपाय आहे. शिक्षणाशिवाय मानवाची सर्वांगीण प्रगती होत नाही. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज,कर्मवीर भाऊराव पाटील यांचा शैक्षणिक वारसा आपल्यापरीने अण्णानी पश्चिम महाराष्ट्रात पुढे चालू ठेवला. अनेक शैक्षणिक संस्था, शैक्षणिक परिसंवाद, महाविद्यालये, हायस्कूल, शाळा, बालवाड्या यांना भरीव आर्थिक साहाय्य दिलेले आहे, देण्याचे कार्य अद्याप चालू आहे. एकेकाळी शिक्षण हे ठराविक वर्गाची मक्तेदारी होती तर ती मोडून काढून सर्वसामान्य,बहुजन समाज,पददलित यांच्या दारापर्यन्त ज्ञानाची गंगा पोहोचविण्याचे पवित्र कार्य अण्णानी आजपर्यन्त केले व करीत आहेत.

## संदर्भ


१ रत्नकुंभ - मुलाखत - दे.भ.रत्नाप्पा कुंभार - पृ.क्र. ८२

२ रत्नकुंभ - स्मरणिका - कौन्सिल ऑफ एज्युकेशन - १९८५ पृ.क्र. ६

३ किता ७

४ किता १

५ दै. सागर - पृ.क्र. १५

६ रा.तु.भगत - हे. कुंभ अक्षावे - पृ.क्र. १९१

७ कोल्हापूर - २४-९-१९७३ - पृ.क्र. १९३

८ कोल्हापूर - २४-९-१९७३ - पृ.क्र. १९९

९ मिरज - १२-६-१९७० - पृ.क्र. २०१

१० कोल्हापूर - २२-८-१९७२ - पृ.क्र. २०३

११ कोल्हापूर - २२-८-१९७२ - पृ.क्र. २०५

१२ इचलकरंजी - ११-८-१९७३ - पृ.क्र. २०७

१३ नागपूर - २५-१-७१ - पृ.क्र. २१२

१४ नागपूर - २५-१-७१ - पृ.क्र. २१३

१५ नागपूर - २५-१-७१ - पृ.क्र. २१४

१६ नागपूर - २५-१-१९७१ - पृ.क्र. २१५

१७ दै. सागर - पृ.क्र. १६.